प्रकरण तिसरे

वाळवा तालुका कारागिर विकास ग्रामीणीय संवाची उद्दिष्टये व व्याप्ती

प्रकरण तिसरे

वाळवा तालुका कारागिर विकास ग्रामोद्योग संघाची उद्दिष्टये व व्याप्ती

३.१ प्रास्ताविक

३.२ संघाची उद्दिष्टये

३.३ निधी

३.४ कर्ज देण्याची अटी

३.५ नाबार्ड आकृतीबंध

३.६ सभासदत्व

३.७ भाग भांडवल

३.८ व्यवहार

३.९ व्यवस्थापन

३.१० व्यवस्थापन समितीची घटना
(कार्यकारी समितीची घटना)

प्रकरण तिसरे

वाळवा तालुका कारागिर विकास ग्रामोद्योग संघाची उद्दिष्टे व व्याप्ती

३.१ प्रास्ताविक :

भारत हा देश शेतीप्रधान आहे. भारतात औद्योगिकरणाचा म्हणावा तितका विकास झालेला नाही. भारतात महाराष्ट्राचा विचार केल्यास तीच परिस्थिती दिसून येते. महाराष्ट्रातील उद्योगांचा विकास व्हावा म्हणून १९६२ मध्ये खादी ग्रामोद्योग मंडळाची स्थापना झाली. परंतु ज्यांना बारा बलुतेदार म्हणतात अशा कारागिरांना त्याचा फारसा फायदा मिळू शकत नव्हता. कारागिरांना मदत मिळावी, त्यांचा विकास व्हावा म्हणून शासनाकडून केलेले अनेक प्रयोग अयशस्वी झाले. त्यानंतर कारागिरांच्या विकासासाठी प्रत्येक विकास गटातील सर्व व्यवसायांचे कारागिर एका सहकारी संस्थेत आणून गट स्थापन करण्याचे निश्चित केले. त्यानुसार प्रत्येक तालुक्यास एक याप्रमाणे तालुका कारागिरांची एक संस्था नोंदण्यात आली आहे. प्रत्येक विकास गटाचा रोजगार निर्मिती व रोजगाराची हमी हा प्रमुख उद्देश ठेवलेला आहे. गट म्हणजे साठ हजार लोकवस्तीचा भाग होय. बहुतेक ठिकाणी गट व तालुका एकच आहे अशा जागी गटाची लोकवस्ती दोन लाखांपर्यन्त मोठी आहे परंतु काही ठिकाणी एका तालुक्यात एकापेक्षा जास्त गट आहेत.

महाराष्ट्रात असे एकूण २९६ गट आहेत. त्यापैकी २९४ गटांसाठी एक विकास औद्योगिक सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये ४६,००० कारागीर सभासद झाले आहेत. वाळवा तालुका कारागिर विकास ग्रामोद्योग संघ हा एक विकास गट आहे याची स्थापना ३१ जुलै, १९७२ मध्ये झाली.

३.२ संघाची उद्दिष्टये :

१) मागणी किंवा संभाव्य मागणी असलेल्या वस्तूंच्या मालाच्या उत्पादनाची किंवा उत्पादनासंबंधी निर्देश देण्याची व्यवस्था करणे.

२) व्यक्तीश: सदस्यांना किंवा सहकारी संस्थांना किंवा इतर सदस्य गटांना योग्यरित्या अंदाज केलेल्या त्यांच्या गरजानुसार कच्चामाल, रासायनिक उपकरणे इत्यादींची खरेदी-विक्री व पुरवठा करणे.

३) माल साठविण्यासाठी गुदामे बांधणे, ती खरेदी करणे, भाडयाने घेणे अगर देणे.

४) उद्योगातील अद्यावत् सुधारणांचे ज्ञान प्रसारित करणे आणि सदस्यांनी अद्यावत् सुधारलेल्या अवजार साधनांचा व पध्दतींचा अंगीकार करावा यासाठी त्यांना उत्तेजन देणे.

५) नोंदणी अधिका-यांच्या परवानगीने उपरोक्त उद्दिष्टांना चालना देण्याच्या दृष्टीने आणि सदस्यांचा सामाजिक व आर्थिक उत्कर्ष साधनेकरिता इतर सर्व कामे हाती घेणे.

६) विकास गट पंचायत समितीच्या हद्दीतील स्थानिक उद्योग व विशेषत: लघुउद्योग, ग्रामोद्योग आणि कुटीरोद्योग यांचे प्रवर्तन व विकास करणे आणि अखिल भारतीय खादी ग्रामोद्योग आयोग व महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ यांच्या कक्षेतील योजना कार्यान्वित करणे.

७) उद्योग विकासासाठी सदस्यांना सरळ विक्रीने अथवा भाडयाच्या पध्दतीने सुधारित उपकरणे व अवजारे पुरविणे.

८) कच्चामाल, हत्यारे, उपकरणे इ. खरेदी करण्याच्या बाबतीत आणि ज्याला मागणी येऊ शकेल अशा साच्यांची व नमुन्यांची निर्मिती या बाबतीत सदस्यांना माहिती व सल्ला देऊन त्यांना मार्गदर्शन करणे.

९) उद्योगधंद्याची उत्पादनक्षमता वाढविण्याकरिता सदस्यांना आवश्यक असे प्रशिक्षण व तांत्रिक मार्गदर्शन देण्याची व्यवस्था करणे.

१०) सदस्यांना कच्चामालाचा पुरवठा करण्याची व सदस्यांनी तयार केलेल्या मालाच्या विक्रीची व्यवस्था करणे.

११) स्थानिक उद्योगधंद्यासाठी सदस्यांना आवश्यक असणाऱ्या वस्तूंच्या आणि नियंत्रित व दुर्मिळ वस्तूंच्या वाटपाचे काम हाती घेणे.

१२) सदस्यांना प्रक्रियेचे व उत्पादनाचे जे काम योग्यरितीने हाती घेता येण्याजोगे नसेल व ज्याच्यामुळे त्यांचे कार्य सुकर होईल असे काम कार्यान्वित करण्याची व्यवस्था करणे.

१३) सदस्यांच्या करवी उत्पादनाचे काम जातीने हाती घेण्याची व त्यास उत्तेजन देण्याची व्यवस्था करणे.

१४) सदस्यांच्या व संस्थेच्या हिताच्या दृष्टीने उत्पादनाचा व प्रयोग कामाचा आदर्श म्हणून नमुनेदार उद्योग केंद्र चालविणे.

१५) ग्रामोद्योग, लघुउद्योग व इतर स्थानिक उद्योगांच्या विकासासाठी आणि तजन्य मालाच्या विक्रीसाठी प्रसारण प्रचार करणे.

१६) तयार केलेल्या मालाची प्रदर्शने भरवणे वा आयोजित करणे.

१७) संस्थेच्या कार्यक्षेत्रातील चालू वा संभाव्य उद्योगासंबंधी आकडेवारी गोळा करणे व त्याची नोंद ठेवणे.

१८) आवश्यक वाटल्यास सदस्यांची व संस्थेची मालमत्ता, इमारती, कच्चामाल इत्यादींकांचा विमा उतरविण्याची व्यवस्था करणे.

१९) संस्थेच्या कार्यक्षेत्रात स्थानिक उद्योग, ग्रामोद्योग, कुटीरोद्योग, प्राथमिक, औद्योगिक सहकारी संस्था संघटित करणे, त्यावर देखरेख ठेवणे व त्याचा विकास करणे.

२०) खादी व ग्रामोद्योग, हस्तकला आणि लघुउद्योग, कुटिरोद्योग सुरू करून ते कार्यान्वित करण्यासाठी व्यक्तिगत सदस्यांना आर्थिक सहाय्य देणे किंवा त्याची व्यवस्था करणे.

२१) वरील उद्दिष्टांच्या पुर्तीसाठी पुरक व सहाय्यक अशी सर्व कामे हाती घेणे व समाजातील दुर्बल स्तरांचे राहणीमान उन्नत करणे.

२२) खादी व ग्रामोद्योग मंडळ, खादी व ग्रामोद्योग आयोग, बँक शासन व नोंदणी प्राधिका-याच्या संमतीने कर्ज देणा-या इतर संस्था किंवा इतर कोणतीही मंडळे किंवा संस्था आणि पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, स्थानिक मंडळे यासारख्या विविध मार्गांनी निधी व कर्जाऊ रक्मा उपलब्ध करणे आणि नवीन उद्योगधंदा, व्यापार, व्यवसाय, कारखाना इ. सुरु करणेकरिता त्या रक्मा सदस्यांना कर्जाऊ देणे.

२३) ग्रामोद्योग, लघुउद्योग व इतर स्थानिक उद्योगधंद्याचा विकास करणेकरिता संशोधन करणे व त्यास उत्तेजन देणे.

२४) नाबार्डकडून घातलेल्या अटीने कर्जवाटप करणे.

३.३ निधी :

खालीलपैकी कोणत्याही किंवा सर्व मार्गांनी निधी उभारता येतील :

१. भाग भांडवल
२. प्रवेश शुल्क
३. सदस्याकडून आलेल्या ठेवी
४. अनुदाने व देणग्या
५. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदी व तदनुसार तयार करण्यात आलेल्या नियमांच्या अधिन, शासनाकडून आणि खादी व ग्रामोद्योग मंडळाकडून व इतर स्थानिक संस्थाकडून मिळणारे भाग भांडवल, अनुदान व इतर स्वरुपातील शासकीय सहाय्य.
६. शासन, खादी व ग्रामोद्योग मंडळे, खादी व आयोग, जिल्हा परिषदा, स्थानिक संस्था, सहकारी बँका, राष्ट्रीयकृत किंवा अनुसुचित बँका, महामंडळे, राज्य शासन, इत्यादीकडून मिळणा-या कर्जाऊ रक्मा.

३.४ कर्ज देण्याच्या अटी :

१) संस्थेचा सभासद असणे आवश्यक आहे. सभासद होण्यासाठी वय वर्षे १८ ते ४५ दरम्यान असणे आवश्यक आहे.

अ) शेअर्स रु. १०-०० भरावा लागतो.

ब) प्रवेश फी १ रुपया भरावी लागते.

क) शेअर्स अनामत - शेअर्सची प्रक्रिया पुढीलप्रमाणे पूर्ण केली जाते :

१. सुतार, लोहार, ग्रामीण तेलघाणी - रु. २५-००
म.रा.सा.ग्रा. मंडळ - रु. ७५-००. शेअर्स कर्ज ४ टक्के व्याज दराने देते, त्याची मुदत ५ वर्षे असते (एकूण रु. ११०-००)

२. वेत व बांबू, कुंभार, वाख उद्योग, चर्मोद्योग, धान्यदळ व प्रक्रिया उद्योग - रु. १२-५०. म.रा.सा.ग्रा. मंडळ रु. ८७-५०. शेअर्स कर्ज ५ वर्षे मुदतीने देते. त्यासाठी ४ टक्के व्याज दर आकारला जातो (एकूण रु. ११०-००)

सभासदांचे रु. ११०-०० पूर्ण झाले की त्यांना सहकार खाते १:२ याप्रमाणे शेअर्स कर्ज संस्थेस देते. त्यामुळे शेअर्स रक्कम वाढून संस्थेची व सभासदाची कर्ज उचलण्याची क्षमता वाढते.

ड) १९८० नंतर बदल - मागासवर्गीय सभासदांच्यासाठी ज्यांचे उत्पन्न रु. ३५००-०० च्या आत आहे व ते कारागिर पारंपारिक उद्योग करतात अशा कारागिरांना महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाने रु. ११०-०० कर्ज दिले आहे. त्यामुळे अशा सभासद कारागिरांना फक्त १ रुपया भरावा लागतो यामुळे संस्थेची व कारागिरांची कर्ज क्षमता वाढते.

इ) १९८२ नंतर बदल - मागासवर्गीय असणाऱ्या सभासदांना व रु. ४८००-०० पर्यन्त उत्पन्न असणाऱ्यांना रु. ५५-०० कर्ज व रु. ५५-०० मदत महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ देत आहे.

२) कर्जदाराच्या नावावर असलेली मिळकत संस्थेस कर्जापोटी तारण-धाण करून देणे किंवा तारण धाण खत करणे व कर्जाचा बोजा नोंदविणे कर्जदाराच्या नावावर मिळकत नसेल तर अशा व्यक्तींनी दोन लायक जामीन दिल्यास त्याला कर्ज उपलब्ध होऊ शकते.

३) कर्जातून घेतलेली हत्यार अवजारे व त्यांनी तयार केलेला माल संस्थेस नजरधाण करून दिला पाहिजे.

४) उद्योग करणाऱ्या व्यक्तीस त्याचा अनुभव-प्रशिक्षण असावे किंवा प्रशिक्षण घेण्याची तयारी असावी. प्रशिक्षण खर्च महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ करते.

५) नाबार्डने ठरवून दिलेल्या पॅटर्नमधील उद्योग करणारा तो कारागिर असला पाहिजे.

३.५ <u>नाबार्ड पॅटर्न</u> :

नाबार्डने ठरवून दिलेल्या उद्योगांची नावे पुढीलप्रमाणे :

१. धान्य व डाळ प्रक्रिया उद्योग
२. ग्रामीण तेलघाणी
३. ग्रामीण चर्मोद्योग
४. वेत व बांबू उद्योग
५. सुतार व लोहार उद्योग
६. ग्रामीण कुंभार उद्योग
७. वास उद्योग
८. लोकर उद्योग
९. चुनखडी उद्योग
१०. अगरबत्ती उद्योग
११. साबण उद्योग

१२. हात कागद उद्योग
१३. औषधी वनस्पती गोळा करणे
१४. शिंक तयार करणे
१५. वाख तयार करणे
१६. फळफळावळ उद्योग
१७. ॲल्युमिनियम उद्योग
१८. स्टोन कटिंग
१९. फोटो फ्रेमिंग
२०. खस टाटी (वाळ्याचे पडदे)
२१. द्रोण व पत्रावळी तयार करणे
२२. शिंपे, हाडे यापासून वस्तू बनविणे
२३. रेक्झीनपासून बनविलेल्या वस्तू विकणे
२४. मेणबत्ती तयार करणे
२५. कापूर तयार करणे
२६. पेपर, पेन्सील, स्टोव्ह पिन्स तयार करणे
२७. शोभेचे बल्ब, बाटल्या तयार करणे
२८. छऱ्यांची जोडणी तयार करणे
२९. सुर्य व वायू उर्जेची उपकरणे तयार करणे
३०. होजिअरी उद्योग
३१. शिवणकाम व रेडिमेंड गारमेंटस्
३२. मासे पकडण्याची जाळी तयार करणे
३३. लॉंड्री (धोबी) युनीट
३४. नाभिक उद्योग
३५. विद्युत व इलेक्ट्रिकल्स उपकरणांची दुरुस्ती व देखभाल करणे
३६. नळकाम (प्लंबींग)

३७) डिझेल इंजिन, पंपसेट दुरुस्ती

३८) पितळ, तांबे व काशापासून मांडी तयार करणे

३९) इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे तयार करणे (स्टॅबिलायझर, रेडिओ, टी.व्ही., इ. जुळणी करणे)

३.६ <u>सभासदत्व</u> :

३.६.१ १) संस्थेच्या कार्यक्षेत्रात राहणारे व उत्पादनाचे काम करणारे व्यक्तिगत कामगार व कारागिर.

२) हस्तव्यवसाय किंवा ग्रामोद्योग, कुटिरोद्योग किंवा लघुउद्योग यात काम करणारे कारागिर व इतर व्यवसायी.

३) राज्य सरकार

४) खादी व ग्रामोद्योग मंडळ

५) पंचायत समिती-जिल्हा परिषद

६) सहकारी बँका

७) सार्वजनिक न्याय्य अधिनियमाखाली नोंदण्यात आलेल्या संस्था.

८) सन १९६० च्या संस्था नोंदणी अधिनियमाखाली नोंदण्यात आलेल्या संस्था.

९) फर्म्स, भागिदारी संस्था

१०) वरील काम व उद्देश पूर्ण करण्यासाठी कार्य करीत असलेले इतर कोणतेही कायद्याने प्रस्थापित झालेले मंडळ

११) राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने मान्य केलेले सहकारी सदस्य व नामधारी सदस्य, परंतु अशाप्रकारच्या सदस्यांची संख्या एकूण सभासद संख्येच्या ५ टक्के पेक्षा अधिक असता कामा नये.

३.६.२ <u>सदस्यांचा वर्ग किंवा सदस्यांचे वर्ग यांची पात्रता व अपात्रता</u> :

या संस्थेचा सदस्य होण्यास असा कोणताही इसम पात्र म्हणून समजला जाणार नाही, की ज्याने स्वत:च्या नादारीसाठी न्यायालयात अर्ज केला आहे,

अगर जो अविमुक्त नादार आहे. अगरराजकीय अथवा नैतिक दुराचार विषयक नसलेले गुन्हे सोडून इतर गुन्हाबद्दल ज्याला सजा झाली असेल आणि ज्या शिक्षेत (सजेत) बदल झाला नसेल, अगर ज्या गुन्हास माफी मिळाली नसेल, मात्र सदर शिक्षेची मुदत संपून पाच वर्षांपेक्षा जास्त काळ लोटला असल्यास ही अपात्रता लागू होणार नाही.

३.६.३ एखाद्या इसमाचा लेखी अर्ज व्यवस्थापन समितीने मंजूर केल्याशिवाय सदस्य म्हणून कोणत्याही इसमाला दाखल करून घेता येणार नाही. मात्र तो पूर्ण १८ वर्षांचा असला पाहिजे. त्याने कमीतकमी एक भाग (शेअर) घेतला पाहिजे व भागाची रक्कम व प्रवेश फी म्हणून रु. ११-०० त्याने अर्जासोबत भरले पाहिजेत.

३.६.४ एखाद्या नामधारी सदस्यास संस्थेच्या नफ्यात किंवा मालमत्तेत कोणत्याही स्वरूपाचा हिस्सा अगर वाटा मिळण्याचा अधिकार राहणार नाही व अशा सदस्यास किंवा सहयोगी सदस्यास मतदानाचा अधिकार राहणार नाही.

३.६.५ एखाद्या सदस्यास सदस्यत्वाचा राजिनामा द्यावयाचा असल्यास तो तशी सहा महिन्यांची पूर्वसूचना व्यवस्थापन समितीला देईल. त्याने दिलेला राजिनामा व्यवस्थापन समितीने स्वीकृत केला तर व संस्थेकडे त्याच्याकडून येणे असलेल्या संपूर्ण रक्कमा त्याने भरून दिल्या तरच तो सदस्य म्हणून राहणार नाही. त्याचा राजिनामा स्वीकारल्याच्या तारखेपासून एक वर्षा-पर्यन्त त्याची शेअरची रक्कम परत करण्यायोग्य होणार नाही.

३.६.६ सदस्यत्व संपणे - खाली नमूद केलेल्या कारणामुळे तो इसम सदस्य म्हणून राहणार नाही.

अ) मृत्युनंतर

ब) पोटनियमान्वये संस्थेतून त्याची हकालपट्टी झाल्यावर

क) त्याचे सर्व भाग जप्त झाल्यावर

ड) त्याच्या नावावर असलेल्या त्याच्या सर्व भागांचे हस्तांतर झाल्यावर

इ) त्याने आपल्या सदस्यत्वाचा दिलेला राजीनामा व्यवस्थापन समितीने स्वीकृत केल्यावर

फ) कायमचे वेडेपण

ग) संस्था ज्या भागात कार्य करीत आहे त्या भागात कायम स्वरूपाचे वास्तव्य न करणे.

३.६.७ १५ दिवसांची सूचना सदस्याला दिल्यानंतर खालीलपैकी कोणत्याही कारणावरून व्यवस्थापन समितीला त्या सदस्याचे सदस्यत्व निलंबित करता येते :

अ) तो आपली देणी नेहमीच वेळेवर देत नसल्यास.

ब) संस्थेच्या बाबतीत आपली जी काही कर्तव्ये आहेत ती पुरी करण्यास त्या सदस्याने कसुर केल्यास

क) खोटी विधाने करून संस्थेला जाणूनबुजून फसविल्यास

ड) दिवाळखोर आहे असा त्याच्यासंबंधी निवाडा झालेला असल्यास किंवा तो वैधानिकदृष्टया असमर्थ असल्यास

इ) नैतिक दुराचारासंबंधीच्या गुन्हाबद्दल त्या सदस्याविरुध्द फौजदारी न्यायालयात कायदेशीर कारवाई होऊन त्याला शिक्षा झाली असल्यास.

३.६.८ सदस्यत्व निलंबित करण्यासंबंधीचा आदेश संबंधित सदस्यास लेखी स्वरूपात कळविण्यात येईल. त्यानंतर लगेच एखादी वार्षिक सर्वसाधारण सभा होणार असल्यास हा आदेश त्यावर अखेरचे शिक्कामोर्तब करण्यासाठी त्या सभेसमोर ठेवण्यात येईल. व्यवस्थापन समितीने घेतलेल्या निर्णयाचे समर्थन त्या सभेमध्ये उपस्थित असलेल्या सदस्यांपैकी $\frac{3}{4}$ पेक्षा कमी नाही एवढया बहुमताने

केल्यास व सन १९६० च्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ३५ मध्ये समाविष्ट केलेल्या तरतुदींना अनुसरून त्यांनी त्या समेत मतदान केल्यावर त्या सदस्याचे सदस्यत्व रद्द होईल.

सदस्यत्व निलंबित असल्याच्या कालावधीत त्या सदस्याला आपले अधिकार व विशेष हक्क यांचा वापर करता येणार नाही.

३.७ <u>भाग भांडवल</u> :

संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु. ५०,००० राहील. नोंदणी करणाऱ्या अधिकाऱ्याची विशिष्ट अनुमती घेऊन या अधिकृत भाग भांडवलाची मर्यादा केव्हाकी वाढविता येऊ शकेल.

३.७.१ भागासाठी दर्शनी मूल्य रु. १०-०० राहील. भाग वर्ग केल्यावर प्रत्येक भागाचे दर्शनीमूल्य देण्यात येईल.

३.७.२ भागासाठी देण्यात येणारे अर्ज लेखी स्वरूपात करण्यात येतील व त्यावर व्यवस्थापन समिती विचार करील.

३.७.३ एखाद्या सदस्याने संस्थेचे भाग घ्यावयाच्या कमाल मर्यादेला सन १९६० च्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाचे कलम २८ लागू होईल.

३.७.४ एखाद्या सदस्याने धारण करावयाच्या संस्थेच्या भागधारणेची किमान मर्यादा खालील प्रमाणे राहील :

१. वैयक्तिक कामगार किंवा कारागिर - रु. १०-००
२. खादी व ग्रामोद्योग मंडळ - रु. १००-००
३. पंचायत समित्या-जिल्हा परिषदा - रु. ५००-००

३.७.५ घेण्यात आलेल्या भागासाठी विशिष्ट क्रमांक असलेले भाग प्रमाणपत्र देण्यात येईल. परंतु सहकार, खादी ग्रामोद्योग मंडळ, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, मंडळे व इतर संस्था यांनी जमा केलेल्या हिस्सा भांडवल अंशदानाच्या बाबतीत संस्था फक्त एकच भाग प्रमाणपत्र देईल व त्यावर भागांचे क्रमांक व त्यांचे मूल्य व भागाचे विशिष्ट क्रमांक दर्शविले जातील.

३.७.६ भागांचे हस्तांतर, प्रतिनिधींची नामनियुक्ती व भागाचा परवाना यांना सन १९६० च्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमांची कलमे २९ व ३० या खालील तरतुदी व त्या अन्वये तयार करण्यात आलेले नियम लागू होतील.

अ) संस्था नोंदल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीत एखाद्या सदस्याने धारण केलेला कोणताही भाग दुसऱ्या एखाद्या सदस्याकडे हस्तांतर करण्यात येणार नाही. एखादा मृत झालेल्या सदस्याने जे भाग धारण केलेले होते ते भाग त्याचे वारस किंवा कायदेशीर प्रतिनिधी यांचेकडे जर तो उप-विधीनुसार संस्थेचा सदस्य म्हणून रीतसर दाखल करून घेतला असेल तर हस्तांतर करण्यात येतील.

ब) एक वर्षापेक्षा कमी नाही, एवढ्या कालावधीपर्यन्त एखादा सदस्याने धारण केलेला आपला भाग व्यवस्थापन समितीच्या अनुमतीने तो दुसऱ्या सदस्यास हस्तांतर करू शकतो ज्यांच्या नावाने हस्तांतर करण्यात आलेले आहे, त्यांचे नाव, भाग, हस्तांतर रजिस्टरमध्ये दाखल करून प्रत्येक भागामागे २५ पैसे याप्रमाणे शुल्क भरून देईपर्यन्त असे कोणतेही हस्तांतर पूर्ण होणार नाही.

क) एखादा सदस्य मृत्यू पावल्यानंतर त्याच्या नावे जमा असलेले भाग, नफ्यातील हिस्सा इ. त्याच्याकडून येणे असलेल्या रक्मा वजा करून जी काही रक्कम येईल ती, तो मृत पावल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत त्याने जामिनयुक्त केलेल्या इसमाला किंवा अशा नामनियुक्तीच्या अभावी अशा एखाद्या इसमाला की जो मृत सदस्याचा वारस किंवा कायदेशीर प्रतिनिधी आहे. या नात्याने ती रक्कम मिळण्याचा हक्क आहे असे व्यवस्थापन समितीला वाटेल, त्या इसमाला त्याने तोटा किंवा नुकसान न होऊ देण्याची हमी घेणारे पत्र संस्थेच्या नावे करून दिल्यास दिली जाईल. परंतु जर ठेवीला काही मुदत असेल तर ती पूर्ण झाल्याशिवाय मृत सदस्याच्या नावे जमा असलेल्या रक्मा तशारितीने दिल्या जाणार नाहीत.

ड) जर संस्थेला सरकार, खादी व ग्रामोद्योग मंडळ, पंचायत समिती व जिल्हा परिषदा यांच्याकडून भाग भांडवल अंशदान, जे एखाद्या विशिष्ट कालावधीत किंवा कालावधीनंतर परपाई करावयाचे आहे, मिळाले तर जोपर्यन्त सरकारने दिलेले भाग भांडवली अंशदान पूर्णपणे परत दिले जात नाही तोपर्यन्त सदस्याच्या भाग भांडवलाची कोणतीही रक्कम संस्था परत करणार नाही. विशेष बाबी व्यतिरिक्त नोंदणी प्राधिकाऱ्याची त्वरीत मंजुरी घेऊन हो गोष्ट करण्यात येईल.

इ) राज्य सरकारने विहीत केलेल्या पध्दतीने व कालावधीत राज्य सरकारने घेतलेले भाग भाधारी घेतली जातील.

३.८ व्यवहार :

निधी उपलब्ध असेल त्याप्रमाणे सभासदांच्या व्यवसायासाठी त्यांना आवश्यक असेल त्याप्रमाणे स्थानिक उद्योगासाठी उपयुक्त असणारी साधनसामुग्री आणि उपकरणे इ. संस्था खरेदी करील त्यांचा साठा करील व विक्रीसाठी माल पाठविणाऱ्याकरिता त्यांचे खात्यावर नोंद करून ठेवील.

अ) खादी व ग्रामोद्योग मंडळ, आयोग, सरकार, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, सहकारी बँका आणि इतर संस्था व एजन्सीज यांच्याकडून संस्था निधी घेईल आणि तो निधी वैयक्तिक सभासदांना, कारागिरांना त्यांच्या उद्योगधंद्यासाठी व व्यवसायासाठी पुन्हा कर्ज म्हणून देईल.

ब) वैयक्तिक सभासदांकडून, कारागिरांकडून येणे असलेल्या कर्जाची संस्था वसुली करील आणि ती त्या कर्जाच्या रकमेच्या वापरावर आणि वैयक्तिक सभासदांनी हाती घेतलेल्या उद्योगधंद्यावर देखरेख ठेवील.

क) वैयक्तिक सभासदांनी, कारागिरांनी व सहकारी संस्थांनी उत्पादन केलेल्या पक्क्या मालासाठी बाजारपेठ मिळविण्याची व्यवस्था संस्था करील.

३.८.१ नोंदणी प्राधिका-यांच्या मान्यतेस आधिन राहून संस्था आपल्या सभासदांनी, कारागिरांनी, औद्योगिक संस्थांनी, सहकारी,संस्थांनी चालविलेल्या उद्योगाच्या उत्पादन क्षमतेत वाढ व्हावी या उद्देशाने त्या संबंधीची प्रक्रिया व उत्पादन ही कामे हाती घेण्याची व्यवस्था करील.

३.८.२ कच्च्यामालाचे, साधनाचे आणि इतर मालाचे विक्रीचे दर व्यवस्थापक व्यवस्थापन समितीच्या आदेशानुसार वेळोवेळी निश्चित करील.

३.८.३ संस्था सभासदांच्या पक्क्या मालाची विक्री करण्यासंबंधीची व्यवस्था करील.

३.८.४ संस्था आपल्या खर्चाने किंवा ज्या सभासदांसी अगोदरच विचारविनिमय केला आहे आणि ज्यांनी आवश्यक ते अंशदान देण्याचे लेखी मान्य केले आहे अशा सभासदांच्या खर्चाने योग्य त्या केंद्राचे ठिकाणी प्रदर्शन करा आणि विक्री करा उघडील. संबंधित सभासदांचे संभाव्य कमाल दायित्व किती आहे याबाबतीत व्यवस्थापन समिती सभासदांना अगोदर कळविल आणि प्रत्येक वर्षी किंवा कमी कालावधीत त्यांच्या खात्यावर जमा असलेल्या रकमेतून त्याची भरपाई करील.

३.८.५ संस्था सभासदांचा पक्का माल विक्रीसाठी सहकारी संस्था अधिनियमाखाली नोंदण्यात आलेल्या मंडळाजवळ किंवा संस्था अधिनियमाखाली, सार्वजनिक न्याय अधिनियमाखाली नोंदण्यात आलेल्या मंडळाजवळ किंवा अशाच इतर वैध मंडळाजवळ किंवा कोणत्याही अशा एखाद्या संस्थेच्या सभासदांजवळ जर संबंधित संस्था व्यवस्थापन समिती ठरविल. एखाद्या मर्यादेपर्यन्त त्या सभासदाबद्दल हमी घेत असेल तर माल पाठविणा-या खात्यावर ठेवील. संस्था नोंदणी अधिका-यांच्या संमतीने अशा मंडळाना त्यांचे एजंट म्हणून नेमणूक करील. संस्था राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या संमतीने, ज्या इसमाने त्या कारणासाठी योग्य त्या बँकेची हमी दिलेली आहे अशा कोणत्याही इसमाची देखील नेमणूक करील.

३.८.६ व्यवस्थापन समिती मालाच्या किंवा कर्जाच्या व्यवहारावरील कमिशनचा किंवा नफ्याचा अगर व्याजाचा दर निश्चित करील.

३.८.७ व्यवस्थापन समिती कर्ज मंजूर करण्यापूर्वी प्रत्येक उद्योगासाठी आणि प्रत्येक कारागिरांसाठी, सहकारी संस्थेसाठी पतमर्यादा निश्चित करील.

२.९ <u>व्यवस्थापन</u> :

२.९.१ संस्थेच्या अधिमंडळामध्ये (जनरल बॉडी) सर्व कारागिर सभासद व संस्थेत प्रवेश दिलेल्या सर्व संस्थांचा समावेश होईल.

२.९.२ वार्षिक सर्वसाधारण सभेत देण्यात आलेल्या अधिकाराप्रमाणे सभासदांच्या पहिल्या सर्वसाधारण सभेला अधिकार राहील.

२.९.३ सहकारी वर्ष संपल्यानंतर तीन महिन्याच्या आत वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात येईल. त्यात खालील कार्यांचा समावेश राहील :

अ) व्यवस्थापन समितीने तयार केलेले वार्षिक अहवाल आणि लेखी विवरणे स्वीकृत करणे व त्यावर विचार करणे आणि गतवर्षी संस्थेने केलेल्या कार्यांचा आढावा घेऊन नफा वाटयास मंजुरी देणे.

ब) आवश्यक वाटल्यास आगाऊ वर्षासाठी आंतर लेखापरीक्षकांची नेमणूक करणे आणि त्यांचे वेतन निश्चित करणे.

क) पोट कायद्यान्वये व्यवस्थापन समिती ज्या कमाल मर्यादेपर्यन्त निधी वाढवू शकेल ती कमाल मर्यादा निश्चित करणे.

ड) लेखा परीक्षाज्ञापन किंवा सहकारी संस्थांच्या प्रबंधकाकडून किंवा त्यांच्या दुय्यम अधिकाऱ्याकडून आलेला कोणताही पत्रव्यवहार किंवा अगोदरच सभेत ठेवण्यात आलेले कोणतेही कामकाज यावर विचार करणे.

इ) व्यवस्थापन समितीच्या आदेशाविरुध्द केलेल्या अपिलावर विचार करणे आणि सर्वसाधारणपणे संस्थेच्या कामकाजासंबंधी कोणत्याही बाबतीत सर्वोच्च अधिकाऱ्याचा वापर करणे.

३.९.४ व्यवस्थापन समितीची (कार्यकारी समितीची) निवड करणे.

संस्थेची एक स्वतंत्र अशी कर्मचारी समिती राहील आणि त्यात खालील सभासद राहतील :

अ) संस्थेचा अध्यक्ष (समिती प्रमुख)

ब) मध्यवर्ती आर्थिक एजन्सीचा एक प्रतिनिधी

क) संस्थेचा व्यवस्थापक (चिटणीस)

ड) संस्थेच्या व्यवस्थापन समितीने आपल्या सभासदामधून निवडलेला एक सभासद

इ) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचा एक प्रतिनिधी.

तीन सभासदांची गणपूर्ती होईल. सरकारने, खादी आणि ग्रामोद्योग मंडळाने, बँकेने किंवा एखाद्या इतर संस्थेने संस्थेच्या व्यवस्थापनाखाली ठेवलेल्या संस्थेच्या कर्मचाऱ्यावर आणि प्रदोत्र कर्मचाऱ्यावर समिती सर्वसाधारण-पणे नियंत्रण ठेवील आणि विशेषत: प्रदोत्र कर्मचाऱ्यांच्या दौऱ्याच्या कार्यक्रमास समिती मान्यता देईल आणि त्यांच्या रोजनिशी तपासून त्या संमत करील त्यांच्या तपासणीज्ञापनाची छाननी करील आणि आवश्यक ते आदेश संमत करील. कमीतकमी महिन्यातून एकदा समितीची बैठक होईल. संस्थेचे कार्य योग्य कार्यक्षमरितीने व्हावे यादृष्टीने व्यवस्थापन समितीची आणि नोंदणी प्राधिकाऱ्यांची मान्यता घेऊन कर्मचारी समिती तपशीलवार नियम तयार करील.

३.९.५ वार्षिक सर्वसाधारण सभेच्या बाबतीत १४ दिवसांची पूर्वसूचना व विशेष सर्वसाधारण सभेच्या बाबतीत ७ दिवसांची पूर्वसूचना सभासदांना देण्यात येईल. सर्वसाधारण सभेची तारीख, वेळ व ठिकाण आणि सभेपुढील कामकाज यांचा पूर्वसूचनेमध्ये उल्लेख करण्यात येईल.

३.९.६ समिती प्रमुखाद्वारे किंवा समितीच्या बहुमताने किंवा नोंदणी प्राधिकरणाच्या विनंतीवरून किंवा संस्थेच्या $\frac{१}{५}$ सभासदांच्या लेखी मागणी वरून एक विशेष सर्वसाधारण सभा कॅव्हाही बोलाविण्यात येईल. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७६ च्या तरतुदीनुसार, सभासदां-कडून विनंती अर्ज आल्यावर किंवा नोंदणी प्राधिका-याकडून आदेश आल्यावर अशाप्रकारची एक सभा एक महिन्याच्या आत बोलाविणे ही समिती प्रमुखाची जबाबदारी राहील.

३.९.७ प्रत्येक सभासदाला व प्रतिनिधीला फक्त एकच मत राहील.

३.९.८ समान मतदानाच्या प्रसंगी समिती प्रमुखाला त्याच्या नेहमीच्या मताशिवाय एक निर्णायक मत राहील.

३.९.९ प्रतिनिधीच्या एकूण संख्येच्या $\frac{१}{५}$ किंवा २५ ची संख्या कमी असेल त्या संख्येने सर्वसाधारण सभेची गणपूर्ती होईल. गणपूर्तीच्या अभावी सर्वसाधारण सभा घेण्यात आली नाही तर, सर्वसाधारण सभा बोलावण्या-संबंधीच्या नोटीशीमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे ती सभा पुढील वेळेपर्यन्त त्याच दिवशी किंवा नंतरच्या तारखेपर्यन्त, ७ दिवसापेक्षा अगोदर नव्हे, स्थगित करण्यात येईल आणि अशा स्थगित करण्यात आलेल्या सभेच्यावेळी गणपूर्ती असो अगर नसो मूळ सभेच्या कार्यावळीवर दाखविण्यात आलेले कामकाज चालविण्यात येईल.

३.९.१० सर्वसाधारण सभेचे अध्यक्षपद व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किंवा त्यांचे अनुपस्थितीत उपाध्यक्ष यांच्याकडे राहील. दोघेही अनुपस्थितीत असल्यास सभेस उपस्थित असलेले सभासद सर्वसाधारण सभेसाठी अध्यक्षाची निवड करतील.

12042

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY

३.१० व्यवस्थापन समितीची घटना (कार्यकारी समितीची घटना)

व्यवस्थापन समितीचे सभासद खालीलप्रमाणे असतील.

अ) खादी व ग्रामोद्योग मंडळाने नामनिर्देशीत केलेला एक सभासद.

ब) पंचायत समितीने नामनिर्देशित केलेला एक सभासद

क) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने नामनिर्देशित केलेला एक सभासद.

ड) कारागिर सभासदांनी निवडून दिलेले सहा सभासद.

सोसायटीचा व्यवस्थापक सदरहू कमिटीचा सचिव म्हणून काम पाहील.

३.१०.१ अ) संपूर्ण व्यवस्थापन समितीची निवडणूक तीन वर्षांनी एकदा घेण्यात येईल. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड ही तीन वर्षांकरिता असेल. नवीन निवडून आलेल्या कार्यकारी मंडळात ती निवड होईल.

ब) कार्यकारी मंडळाचा निर्वाचित सभासद हा प्रमाणित खादी-धारी असला पाहिजे.

३.१०.२ या उपविधीमध्ये काहीही नमूद केले असले तरी, संस्थेची नोंदणी झाल्यावर राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाच्या संमतीने नोंदणी अधिकारी पहिली कार्यकारी समिती नामनियुक्त करतील. त्या समितीची मुदत तीन वर्षे राहील. राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाच्या सल्ल्याने नोंदणी अधिकाऱ्याला ही मुदत आणखी दोन वर्षेपर्यन्त वाढविता येईल.

३.१०.३ व्यवस्थापन समितीमधील रिकाम्या झालेल्या जागा नोंदणी प्राधिकाऱ्याची पूर्वमान्यता घेऊन समितीच्या सभासदांनी निवड करून भरण्यात येतील. कोणतीही जागा शक्यतोवर एक महिन्यापेक्षा जास्त कालावधीपर्यन्त रिकामी ठेवण्यात येऊ नये. समिती आपल्या अध्यक्षांची व उपाध्यक्षांची निवड स्वत:च करील.

३.१०.४ समितीच्या सर्व बैठकीचे अध्यक्षपद समितीच्या अध्यक्षाकडे राहील. अध्यक्षांच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष समितीचे अध्यक्षत्व स्विकारील आणि दोघेही अनुपस्थितीत असल्यास उपस्थित असलेले सभासद आपल्यातून संबंधित बैठकीसाठी अध्यक्षांची निवड करतील.

३.१०.५ समितीची परवानगी घेतल्याशिवाय समितीच्या लागोपाठ चार बैठकींना गैरहजर राहिल्यास असा निवडून आलेला सभासद समितीच्या सभासदत्वास अपात्र ठरेल.

३.१०.६ सर्वसाधारण सभामध्ये पारित करण्यात आलेले ठराव आणि उपविधीं तरतुदीच्या आधीन राहून संस्थेचे कामकाज करण्याचा संपूर्ण अधिकार कार्यकारी समितीस राहील.

३.१०.७ अ) सर्वसाधारण सभा आणि कार्यकारी समिती व उपसमित्यांच्या बैठकीची निरनिराळी कार्यवृत्त-पुस्तके व्यवस्थापकाकडून ठेवण्यात येतील आणि प्रत्येक बैठकीस उपस्थित असलेल्या सभासदांची नावे व त्या बैठकीतील कामकाज यांची नोंद त्यात घेतली जाईल.

ब) कार्यकारी समितीच्या एखाद्या सदस्याचे वैयक्तिक हितसंबंध ज्यात गुंतलेले आहेत अशा कोणत्याही बाबीची चर्चा एखाद्या बैठकीत चालू असल्यास अशा सदस्यास त्या बैठकीस हजर राहता येणार नाही.

क) कार्यकारी समिती किंवा तिचा सभासद किंवा समितीचा सभासद म्हणून कार्य करणारा कोणताही इसम यांनी केलेल्या सर्व कृती अशी समिती किंवा इसम यांच्या नेमणुकीस काही दोष असल्याचे आढळून आले तरीही सदर समिती किंवा इसम योग्यप्रकारे नियुक्त घटीत करण्यात आले असता अशा कृती ज्या प्रकारे वैध ठरतील तशाच वैध असतील.

ड) कार्यकारी समितीच्या पाच सदस्यांच्या उपस्थितीने गणपूर्ती होईल.

इ) व्यवस्थापन समितीचे अधिकार खालीलप्रमाणे असतील :

१. समितीच्या सभासदांमधून आपला अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड करणे.

२. सभासदत्वासाठी आलेल्या अर्जाबद्दल निर्णय घेणे व माग घेणे.

३. उपविधीच्या अधिन राहून निधी उभारणे.

४. कर्मचारी समितीची नियुक्ती करण्यात आल्यास तिच्या कामकाजावर देखरेख ठेवणे.

५. मालाची खरेदी विक्री व साठा करणे या बाबतच्या प्रश्नाचा निर्णय करणे.

६. राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाची मान्यता घेऊन व्यवस्थापकाची नियुक्ती करणे.

७. व्यवस्थापक व नोकर वर्ग यांचे संबंधातील नोंदणी प्राधिकाऱ्याची मान्यता घेऊन व्यवस्थापक, विक्रेता, लिपीक या सहीत संस्थेच्या वेतनावर काम करणाऱ्या नोकरांची नियुक्ती करणे, त्यांना निलंबित करणे, शिक्षा करणे किंवा नोकरीतून कमी करणे, तसेच नोंदणी प्राधिकारी आणि सर्वसाधारण सभा यांची योग्य ती मान्यता घेऊन आपल्या कर्मचाऱ्यांचे संबंधात रजेचे नियम, भविष्य निर्वाह निधीचे नियम इत्यादी सहीत नोकर व वतनविषयक नियम तयार करणे.

८. संस्थेच्या पगारदार नोकर वर्गाच्या कामकाजावर देखरेख ठेवणे.

९. पगारदार नोकरांकडून आवश्यकतेनुसार जामीनकीची मागणी करणे.

१०. नोंदणी प्राधिकारी व सर्वसाधारण सभा यांची मान्यता घेऊन समितीच्या सभासदांसाठी दैनिक भत्ता, प्रवास भत्ता व सिटींग फीज बाबतचे नियम तयार करणे.

११. कारागिरांना कर्जे मंजूर करणे आणि इतर विशेष कामासाठी उपसमित्या नियुक्त करणे व त्यांचेकडे विशिष्ट अधिकार सोपविणे.

१२. कर्जे मंजूर करणे, त्यांचे वाटप व वसुली आणि इतर प्रकारची मदत यासंबंधीचे नियम तयार करणे आणि कसोटया विहीत करणे व त्यास नोंदणी प्राधिका-याची मान्यता मिळविणे.

१३) संस्थेचा कारभार व कामकाज यांच्या सर्वमान्य प्रशासनासाठी नियम तयार करणे व त्यात दुरुस्ती करणे मात्र असे की, असे सर्व नियम व त्यात करण्यात आलेले कोणतेही फेरफार यास नोंदणी प्राधिका-याने अगोदरच लेखी मान्यता दिलेली असली पाहिजे व अशाप्रकारे मान्यता मिळालेली असल्या-खेरीज ते नियम अंमलात आणता येणार नाहीत.

१४) हिशोब व्यवस्थित ठेवण्याबद्दल व वार्षिक ताळेबंद करण्या-विषयीची सर्व खबरदारी घेणे.

१५) कच्चामाल, तयार माल यांची प्रत्यक्ष पडताळा करण्यासाठी व कर्जाच्या रकमांचा योग्यरित्या वापर होतो किंवा नाही याचा पडताळा करण्यासाठी दर तीन महिन्यांची व्यवस्थापन समितीच्या तीन सभासदांची एक समिती नियुक्त करणे.

१६) संस्थेचामाल व मालमत्ता यांच्या आग किंवा चोरी यापासून होणा-या नुकसानीपासून सुरक्षिततेसाठी त्याचा संपूर्ण विमा उतरविण्याची खबरदारी घेणे.

१७) व्यवस्थापक किंवा विशिष्ट कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या निरनिराळ्या उपसमित्यांकडे आवश्यक ते अधिकार सोपविणे.

१८) कच्चामालावर प्रक्रिया करणे, कच्चामालाचे उत्पादन व त्याचा पुरवठा आणि कोणत्याही स्थानिक उद्योग-धंद्याच्या तयार मालाची विक्री यासाठी कारागिरांच्या सहकारी संस्था, कारखाने किंवा व्यक्ती अथवा कंपन्या यांचे बरोबर करार करणे.

१९) सभासद, कारागिर, सहकारी संस्था यांच्या उद्योगधंद्याच्या कारभारावर देखरेख ठेवणे आणि तयार मालाची विक्री व मालाची खरेदी यासंबंधी कारागिर किंवा संस्था यांना सल्ला देणे, मार्गदर्शन करणे आणि तांत्रिक मार्गदर्शन करून कारागिर, सहकारी संस्था यांच्या कामकाजात सुधारणा करणे.

२०) संस्थेतर्फे खटला दाखल करणे किंवा कायदेशीर कारवाई सुरू करणे, बचाव किंवा तडजोड करणे.

२१) सभासदांनी हाती घेतलेली प्रक्रिया व उत्पादनविषयक कामे योग्य प्रकारे पार पाडली जातील याची खबरदारी घेणे.

२२) संस्थेचे व्यवस्थापन व विकास याबाबतचे इतर सर्व अनुषंगिक कामकाज करणे.

२३) संस्थेच्या हिशोब वसात दर्शविण्यात आलेल्या रोख शिल्लक रकमेची पंधरवड्यातून किमान एकदा तरी पडताळणी करण्यासाठी समिती एखाद्या सभासदाला नावाने प्राधिकृत करू शकेल आणि अशारितीने नेमणूक झाल्यास व्यक्तीने समितीला पुढील बैठकीच्यावेळी पडताळणीचा निष्कर्ष द्यावा.

२४) समितीच्या सभासदांच्या हयगयीमुळे किंवा संस्थेच्या उपविधी अन्वये त्याचप्रमाणे सहकारी संस्था अधिनियम आणि त्याखाली तयार केलेले तात्पुरते अंमलात असलेले नियम या अन्वये त्यांच्यावर सोपविलेल्या कोणत्याही कर्तव्यात अगर कामात त्यांनी हेळसांड केल्यामुळे संस्थेला जे नुकसान येईल ते भरून काढण्यासाठी ते संयुक्तरित्या आणि वैयक्तिकरित्या जबाबदार राहील.

३.१०.८ व्यवस्थापकांची कर्तव्ये खालीलप्रमाणे राहतील :

१) अभिलेख, संस्थेचो सामाईक मुद्रा, जंगम मालमत्ता (डेड स्टॉक) आणि त्यांच्या कब्जात असलेली संस्थेची मालमत्ता किंवा व्यवस्थापक समितीकडून त्यांच्या प्रभारात घेण्यात येणारी मालमत्ता अगर अन्य चीजवस्तू आणि अशी संस्थेची कोणतीही इतर मालमत्ता यांचे अभिरक्षक म्हणून राहणे.

२) संस्थेच्या सर्वसाधारण किंवा विशेष बैठकी आणि उपसमितीच्या बैठकी धरून संस्थेच्या सर्व बैठकींची संबंधिच्या नोटीसा सर्व संबंधितांकडे पाठविणे.

३) संस्थेच्या सर्व बैठकांना हजर राहणे आणि कार्यवृत्त नमूद करून घेणे.

४) संस्थेच्यावतीने कार्यालयाचा पत्रव्यवहार करणे.

५) समितीने घातलेल्या निर्बन्धाच्या आधीन संस्थेच्यावतीने रक्कम स्विकारणे आणि संवितरण करणे.

६) रक्मा आपल्या प्रभारात ठेवणे व त्याची पूर्ण जबाबदारी स्विकारणे.

७) योग्य हिशोब ठेवणे.

८) संस्थेने सुरू केलेल्या दुकानाची किंवा कोणत्याही इतर धंद्याची व्यवस्था उपविधी क्रमांक १.१ मध्ये निर्दिष्ट केलेले संस्थेचे उद्देश परिपूर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यकारी समितीच्या आदेशानुसार व्यवस्थापन करणे.

९) दुय्यम कर्मचाऱ्यांच्या कामावर देखरेख ठेवणे आणि हयगय इत्यादी संबंधित प्रकरणे समितीला सादर करणे.

१०) योजना कार्यान्वित (कार्यवाहित) आणण्याच्या कामावर देखरेख ठेवणे पर्यवेक्षकांच्या कामावर लक्ष ठेवणे आणि कारागिरांनी किंवा संस्थेने हाती घेतलेल्या योजनेची प्रगती आणि कामकाज यासंबंधी समितीला वेळोवेळी अहवाल सादर करणे.